परिपत्रक

जा.क्र. रागुअकें/संगणक/CCTNS/8139/२०१०
अपर पोलीस महासंचालक,
गु.अन्वे. महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय.
दिनांक 19 NOV 2010

संदर्भ - १. पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं /१७/६१६२/संगणक कक्ष/सीसीटीएनएस-२००९, दिनांक ०३/१२/२००९

२. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. रागुअके/संगणक /CCTNS/९८५/२०१०, दिनांक ०१/०२/२०१०

३. पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क. पोमसं /१७/६१६२/सीसीटीएनएस-संगणकीकरण/१५/२०१०, दिनांक २०/०३/२०१०

४. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांचे परिपत्रक क. रागुअके/संगणक/CCTNS /५८७५/२०१०, दिनांक ०६/०८/२०१०

५. पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क. पोमसं /१७/६१६२/सीसीटीएनएस-संगणकीकरण/१५/२०१०, दिनांक २०/१०/२०१०

६. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांचे परिपत्रक क. रागुअके/संगणक/CCTNS /८१०३/२०१०, दिनांक १८/११/२०१०

विषय - CCTNS - Capacity Building Infrastructure अंतर्गत District Computer Training Center (DCTC) अंतर्गत संगणक प्रशिक्षणाबाबत.

******

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून की, दि.१९/११/२०१० रोजी CCTNS District Nodal Offficers च्या बैठकीत आपल्या घटकाच्या प्रतिनिधीबरोबर संगणक प्रशिक्षणासाठी रू.१.२० लाख रकमेचा धनादेश देण्यात येत आहे. CCTNS प्रकल्पांतर्गत प्रत्येक DCTC मध्ये दयावयाच्या संगणक प्रशिक्षण पाठयक्रम तीन IT Basic Module व दोन IT Module Advance Users उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये सर्व घटकांना कळविण्यात आले आहे.

MHA/NCRB यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार तुमच्या घटकातील एकूण मनुष्यबळाच्या ७३% पोलीस अधिकारी व ४२% पोलीस कर्मचारी यांना CCTNS च्या पाठयक्रमाप्रमाणे प्रशिक्षीत करावयाचे असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

यासाठी घटकप्रमुखांनी त्यांच्या स्थानिक पातळीवर उपलब्ध असणा-या संगणक तज्ञाची/संगणक प्रशिक्षण देणा-या संस्थांची निवड करून त्यांच्या मार्फतीने घटकातील नियोजित अधिकारी / कर्मचा-याला की जे संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी उत्सुक आहेत व CCTNS प्रकल्पामध्ये काम करण्याची ज्यांची इच्छा आहे अशांची निवड करून त्यांना हे प्रशिक्षण दयावयाचे आहे.

घटकातील प्रशिक्षीत झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांकडून MHA/NCRB नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार मनुष्यबळाला प्रशिक्षीत करण्याची कारवाई पूर्ण करावयाची आहे.

Create PDF files without this message by purchasing novaPDF printer (http://www.novapdf.com)

असून प्रशिक्षणासाठी खर्च करताना योग्य त्या विहित वित्तिय नियम व कार्यपध्दतीचा अवलंब करून तसे लेखाभिलेख आपआपले घटकाकडील पर्यवेक्षीय अधिका-याच्या परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देता येईल अशा स्वरूपात ठेवावेत.

दि.३१ डिसेंबर २०१० पर्यंत जास्तीत जास्त अधिकारी/कर्मचा-यांना प्रशिक्षित करून एकूण मनुष्यबळाच्या ७३% पोलीस अधिकारी व ४२% पोलीस कर्मचारी प्रशिक्षीत करण्याचे उद्दिष्ट गाठण्याचा घटकप्रमुखांनी प्रामाणिकपणे व कसोशीने प्रयत्न करावयाचा आहे. सध्याच्या काळात, मागील सुमारे १० वर्षापासून पोलीस खात्यामध्ये भरती होणारे अधिकारी व कर्मचारी यांना संगणक विषयक ज्ञानाची चांगली पार्श्वभूमी असतेच असे प्रामुख्याने दिसून आले आहे. त्यामुळे घटकप्रमुखांना अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षीत करण्याचे वरील उद्दीष्ठ गाठण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सोयीस्कर होणार आहे.

घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, संगणक पार्श्वभूमी असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचा गट तयार करून DCTC मार्फतीने दिलेल्या अभ्यासक्रमाच्या पाच Modules प्रमाणे जे आपणाला संदर्भ क्रमांक दोन अन्वये पूर्वीच पाठविण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे प्रथम त्यांची पूर्वतयारी करून घेवून त्यांचे मार्फतीने संपूर्ण घटकामधील पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना प्रशिक्षित करण्याची कार्यवाही करावी. प्रशिक्षण अनुदान सध्यातरी एवढेच मर्यादित आहे. तसेच शासनाकडून/पोमसं कार्यालयाकडून मिळणा-या प्रशिक्षण अनुदानाचा देखील या प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे वापर करता येईल का? यासंबधी देखील घटक प्रमुखांनी विचार करणे शक्य आहे.

दि.३१ डिसेंबर २०१० पर्यंत एकूण मनुष्यबळापैकी किती टक्के पोलीस अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षीत झाले याचा अहवाल पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई तथा अध्यक्ष State Empowered Committee व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे तथा अध्यक्ष State Mission Team यांना न चूकता पाठविण्याची दक्षता घेणेस सर्वांना विनंती करण्यात येत आहे.

( मा.का.कर्वे )
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे व
**Mission Leader, CCTNS Project.**

प्रति,

१. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी -

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.

प्रत सादर -

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Create PDF files without this message by purchasing novaPDF printer (http://www.novapdf.com)